# महाराष्ट्र शासन
# अल्पसंख्याक विकास विभाग
# जाहिरात

वक्फ अधिनियम, १९९५ मधील कलम २३ अन्वये विहित करण्यात आलेल्या सदर तरतूदीनुसार शासनाच्या सह सचिव दर्जापेक्षा कमी नसलेल्या अधिकाऱ्याची प्रतिनियुक्तीने किंवा या संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या मुस्लीम अधिकाऱ्याची महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळावर मुख्य कार्यकारी अधिकारी या पदावर नियुक्ती करावयाची आहे. सदर पदासाठीच्या अर्हता/अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत -

**अर्हता :-**

१) संबंधित अधिकारी शासनाच्या सह सचिव दर्जापेक्षा कमी नसलेला असावा.

२) महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळावर मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर नियुक्त होणारा अधिकारी हा अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असेल.

३) मुख्य कार्यकारी अधिकारी पदाच्या प्रथम प्रतिनियुक्तीचा/नियुक्तीचा कार्यकाळ हा त्याने आपल्या पदावर प्रत्यक्ष रुजू झाल्याच्या दिनांकापासून ३ वर्ष असा असेल.

४) सेवेत कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यास मूळ संवर्गातील नियमित वेतनश्रेणीतील वेतन व भत्ते अनुज्ञेय असतील.

वर नमूद केल्याप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ या पदावर काम करण्यास इच्छूक अधिकाऱ्यांनी दि.०३.०९.२०२५ रोजी सायंकाळी ०४.०० वाजेपर्यंत अवर सचिव (का.४), अल्पसंख्याक विकास विभाग, खोली क्र.७१४, ७ वा मजला, मंत्रालय (विस्तारित), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई- ४०० ०३२ यांच्याकडे ई-मेल क्र.desk4.mdd-mh@gov.in/ टपालाने/ कुरिअरने सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात अर्ज सादर करावा. अपूर्ण आणि विहित दिनांक व वेळेनंतर प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जजाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

प्राप्त अर्जांचे मूल्यमापन करुन, आवश्यकता भासल्यास मुलाखती घेऊन पात्र अधिकाऱ्यांची निवड करण्यात येईल.

सही-/
उप सचिव,
अल्पसंख्याक विकास विभाग

E:\CEOAppntLtr.docx

# महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, छत्रपती संभाजीनगर येथे मुख्य कार्यकारी अधिकारी पदासाठी इच्छूक अधिकाऱ्यांकडून नावे मागविण्यासाठीच्या अर्जाचा नमूना

| फोटो |
|---|
| |

१ नाव:

२ सेवेत असल्यास सध्याचे पदनाम व वेतनस्तर:

३ सध्याचा पत्ता:

४ जन्मदिनांक:

५ कार्यालयाचे नाव व पत्ता :

६. अर्जाच्या दिनांकाच्या वेळी वय :

७ भ्रमणध्वनी क्रमांक:

८ दूरध्वनी क्रमांक:

९ ई-मेल :

१० कायमचा मूळ पत्ता:

११ शैक्षणिक पात्रता:

१२ राज्यकेंद्र/ शासनातील कामाचा अनुभव:

| अ.क्र | पदाचे नाव | विभाग | कालावधी | | वेतनश्रेणी | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत | | |

१३ मुल्यांकन अहवाल/गोपनीय अहवाल (लगतच्या ५ वर्षाचे):

| **अ.क्र.** | **वर्ष** | **प्रतवारी** |
|---|---|---|

१४ सेवाकाळातील कोणतीही विभागीय चौकशी,फौजदारी प्रकरण, लाचलुचपत गुन्हयासंदर्भातील प्रकरण, न्यायालयीन प्रकरण किंवा इतर कोणतीही कार्यवाही : प्रलंबित/ चालू असल्यास त्याबाबतचा तपशील:

दिनांक :

ठिकाण :

अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी

# घोषणा

मी श्री/श्रीमती............................ असे प्रमाणित करते/करतो की, मी प्रतिनियुक्तीने/नियुक्तीने भरावयाचा पदाच्या मागणी पत्रातील तपशील वाचले असून, सदर पदासाठी विहित केलेल्या अर्हता मी धारण करीत असल्याने सदा पदावर प्रतिनियुक्तीसाठी/नियुक्तीसाठी अर्ज सादर करीत आहे. अर्जात नमूद केलेली माहिती खोटी आढळून आल्यास माझा अर्ज नाकारला जावू शकतो याची मला जाणीव आहे.

दिनांक :

ठिकाण :

सही......................................

नाव.......................................

पदनाम..................................